संक्षिप्त फौ. ख. क्र.८७४/२०२१
सरकार वि. राजू उर्फ खट्टू

नि. क्र.११ खाली

CNR No. MHCH160016682021

## न्यायनिर्णय

(दिनांक १० ऑगस्ट, २०२६)

खटल्याचे निर्णयाकरीता खालील मुद्दे उत्पन्न होतात. त्यावरील निष्कर्ष मी खालील नमुद केलेल्या कारणमिमांसेसह विषद करीत आहे –

| अ.क्र. | मुद्दे | निष्कर्ष |
|---|---|---|
| १) | अभियोगपक्ष असे सिध्द करतो काय की, आरोपी हा दिनांक ०८/०६/२०२१ चे १९.५० वाजताच्या सुमारास चिमूर ते वरोरा रोड, शेगाव बु., ता. वरोरा, जि. चंद्रपूर येथे स्वतःचे ताब्यात ०७ नग प्रत्येकी ९० मि.ली. ने भरलेल्या देशी दारु विना परवाना म्हणजेच अवैधरित्या स्वतःच्या फायद्यासाठी किंवा विक्रीसाठी बाळगतांना मिळून आला ? | नाही. |
| २) | आदेश काय? | अंतीम आदेशान्वये आरोपीला निर्दोष मुक्त करण्यात येते. |

## कारणमिमांसा

२. अभियोगपक्षाने आरोपीच्या विरुध्द दोषारोप सिध्द करण्याकरीता केवळ एक साक्षीदार तपासला. साक्षीदार क्र.१ दशरथ हिरामण कापटे हा अभियोगपक्षाच्या कथनानुसार घटनास्थळ व जप्ती पंचनाम्यावरील पंच साक्षीदार आहे. मात्र त्याने अभियोगपक्षाच्या कथनास सुसंगत साक्ष नोंदविली नाही. अभियोगपक्षाला कोणतेही

दस्ताऐवज सिध्द करण्यात यश आलेले नाही. आरोपीने बचावात कोणताही पुरावा दिलेला नाही.

<u>**मुद्दा क्रमांक १ करीता**</u> –

३. साक्षीदार क्र.१ हा घटनास्थळ व जप्ती पंचनाम्यावरील पंच साक्षीदार आहे. तो स्वतंत्र साक्षीदार असल्यामुळे त्याच्या साक्षीला अनन्यसाधारण महत्व आहे. त्याने त्याच्या साक्षीत तो आरोपीला ओळखत नाही, पोलिसांनी त्याला दि.०८/०६/२०२१ रोजी कुठेही बोलाविले नव्हते. त्याच्या समक्ष कोणताही घटनास्थळाचा व जप्तीचा पंचनामा झाला नाही. पंचनाम्यावर त्याची सही असून त्यातील मजकूर माहित नसल्याचे सांगितले. साक्षीदार क्र.१ हा अभियोगपक्षाच्या कथनास सुसंगत साक्ष नोंदवित नसल्यामुळे विद्वान सहाय्यक सरकारी अभियोक्ता यांनी त्याला उत्तरसुचक प्रश्न विचारले असता अभियोगपक्षाच्या कथनानुसार अपराधाची घटना घडल्याची बाब त्यांनी नाकारलेली आहे. त्यामुळे त्याची साक्ष आरोपीचे अपराधीत्व सिध्द करण्यास पुरेशी नाही.

४. अभिलेखावर आरोपीकडून दारु जप्त करण्यात आली, जप्तीतील मुद्देमालातून रासायनिक परिक्षणाकरीता नमुना तयार करण्यात आला व त्याचेच रासायनिक परिक्षण होऊन अहवाल प्राप्त झाला याबाबत कोणताही पुरावा उपलब्ध नाही. परिणामतः अभियोगपक्ष आरोपी हा ०७ नग प्रत्येकी ९० मि.ली. ने भरलेल्या देशी दारु बाळगतांना मिळून आला ही बाब सिध्द करु शकला नाही. सबब, मी मुद्दा क्र. १ चे निष्कर्ष नकारार्थी नोंदवितो.

<u>**मुद्दा क्रमांक २ करीता**</u> –

५. मुद्दा क्र.१ च्या निष्कर्ष व कारणमिमांसेवरुन अभियोगपक्ष आरोपीच्या विरुध्द महाराष्ट्र दारुबंदी कायद्याचे कलम ६५ (ई) नुसार गुन्हा केल्याचे सिध्द करीत नाही. त्यामुळे आरोपी हा सदर अपराधातून निर्दोष मुक्त होण्यास पात्र आहे. जप्तीतील दारु ही कायदेशीर विल्हेवाटी करीता राज्य उत्पादन शुल्क विभागाकडे पाठविणे न्यायोचीत ठरेल. अंततः मी खालीलप्रमाणे आदेश पारीत करीत आहे.

संक्षिप्त फौ. ख. क्र.८७४/२०२१
सरकार वि. राजू उर्फ खटू

## आदेश

१. आरोपी नामे **राजू उर्फ खटू शामराव पचारे,** रा. शेगाव बु., ता. वरोरा, जि. चंद्रपूर यांची फौजदारी प्रक्रिया संहितेचे कलम २५५ (१) नुसार महाराष्ट्र दारुबंदी कायद्याचे कलम ६५ (ई) या गुन्ह्याच्या आरोपातून निर्दोष मुक्तता करण्यात येते.

२. आरोपीचे जामीन बंधपत्र रद्द करण्यात येते.

३. जप्त मुद्देमाल देशी दारु ही कायदेशीर विल्हेवाटीकरीता राज्य उत्पादन शुल्क विभाग, चंद्रपूर यांचेकडे पाठविण्यात यावी.

४. फौजदारी प्रकिया संहितेचे कलम ४३७ (अ) विचारात घेता या न्यायनिर्णयास आव्हान देण्यात आल्यास अपिलीय न्यायालयासमोर आरोपीची हजेरी निश्चित करण्याकरीता त्याने या आदेशापासून पुढिल सहा महिन्याकरीता रुपये १५,०००/– चे जामीन बंधपत्र करुन द्यावे.

(न्यायनिर्णय खुल्या न्यायालयात पारीत व घोषीत.)

DISTRICT COURTS MAHARASHTRA
सत्यमेव जयते

Digitally signed by SUVIDHA GAJANAN PANDE
Date: 2026.08.10 13:52:19 +0530

ठिकाण – वरोरा.
दिनांक – १०/०८/२०२६.

(श्रीमती. सुविधा ग. पांडे/यावलकर)
न्यायदंडाधिकारी, प्रथम श्रेणी,
(न्यायालय क्र.१), वरोरा.

# C E R T I F I C A T E

I affirm that, the contents of this P.D.F. file Judgment are same, word to word, as per the original Judgment.

| | | |
|---|---|---|
| Name of Stenographer | :- | Shri. C.N. Lohakare |
| Court Name | :- | Court of J.M.F.C., (Court No.1) Warora, Dist. Chandrapur. |
| Date of Judgment | :- | 10/08/2026 |
| Judgment signed by the Presiding officer on | :- | 10/08/2026 |
| Judgment uploaded on | :- | 10/08/2026 |